RNI No. MAHBIL/2012/48433
www.dgps.maharashtra.gov.in.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - ७, अंक - १९ ] गुरुवार ते बुधवार, मे १० - १६, २०१८ / वैशाख २० - २६, शके १९४० [ पृष्ठे ६०

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय / संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### जिल्हाधिकारी यांजकडून

*महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६*

*अधिसूचना*

क्रमांक २०१८/भूसंपादन/सोमपा/कार्या-१/एसआर-१/२०१८/आरआर-२०५६.--ज्याअर्थी, सोलापूर महानगरपालिकेची विकास योजना (दुसरी सुधारित) (यापुढे "उक्त विकास योजना/सुधारित विकास योजना" म्हणून संबोधिलेली) शासनाने नगर विकास विभागाची अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१५/१०५७/प्र. क्र. २८६/१५/वियो मंजुरी/नवि-१३, दिनांक २ सप्टेंबर २०१६ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१, पोट-कलम *(१)* अन्वये (यापुढे "उक्त महाराष्ट्र अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मंजूर केली असून ती दिनांक २ सप्टेंबर २०१६ पासून अमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेली जमीन (यापुढे "उक्त जमीन" म्हणून संबोधिलेली) यापूर्वी पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्या मंजूर विकास योजनेनुसार (१९८४) ओपन स्पेस पार्ककरिता आरक्षित होती व ज्याअर्थी, उक्त जमीन सोलापूर महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेनंतर उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील प्रस्तावानुसार "सार्वजनिक वापर" या प्रस्तावाने बाधित होत आहे (यापुढे "उक्त सार्वजनिक प्रस्ताव" म्हणून संबोधिलेला) ;

आणि ज्याअर्थी, सोलापूर महानगरपालिकेने (यापुढे "उक्त महानगरपालिका" म्हणून संबोधिलेली) उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(४)* अन्वये उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी संपादन करणेबाबत शासनाकडे अर्ज केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १५१, पोट-कलम *(१)* खाली काढलेल्या अधिसूचना क्रमांक टीपीएस-२१७५/५१०६/युडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये मंजूर विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्दिष्टित करण्यात आलेल्या जमिनीबाबतच्या उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१), (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२५ मधील तरतुदीनुसार उक्त सार्वजनिक प्रस्तावासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी, सोलापूर, यांची खात्री झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या संपादनापोटी द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम संपूर्णपणे उक्त महानगरपालिकेने अदा करावयाची आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(२)* मध्ये निर्दिष्टित केलेली कालमर्यादा उलटून गेलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१५ च्या नियम ५ *(दोन)* नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत विकास योजनेतील आरक्षित जमिनीचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे "उक्त संपादन अधिनियम" म्हणून संबोधिलेला) मधील कलम ४ ते १५ (दोन्हींसह) मध्ये नमूद कार्यपद्धतीस सूट दिली आहे व ज्याअर्थी, सदरचा (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१५ हा महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्रमांक ७१, भाग-४, दिनांक ३१ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध झालेला आहे आणि म्हणून उक्त संपादनाच्या अधिनियमाच्या कलम १९ च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे सरळ याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्रमांक १९६, भाग चार-अ, दिनांक २७ ऑगस्ट २०१४ रोजी अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केलेले भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ च्या नियम १७ नुसार या संपादन प्रस्तावाच्या प्रकल्पातील बाधित कुटुंबे ही उक्त संपादन अधिनियमाच्या दुसऱ्या व तिसऱ्या अनुसूचीनुसार पुनर्वसन व पुनर्वसाहतीचे घटक म्हणून विचार केला जाण्यासाठी पात्र नाहीत.

त्याअर्थी, शासनाने प्रदत्त केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त महाराष्ट्र अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(४)* सह उक्त संपादन अधिनियमाच्या कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर असे घोषित करतात की, उक्त जमीन उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक आहे ;

उक्त जमिनीच्या संबंधात यापुढे करावयाच्या सर्व संपादनाच्या कार्यवाहीबाबत, जिल्हाधिकाऱ्यांचे काम पार पाडण्याकरिता उक्त संपादन अधिनियमाच्या कलम ३ खंड *(ग)* अन्वये याद्वारे उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक ७ (मोहोळ), सोलापूर यांची नेमणूक करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे उक्त जमिनीच्या संपादनाची कार्यवाही उक्त सार्वजनिक प्रस्तावाच्या प्रयोजनासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरू करावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

उक्त जमिनीचे सर्व्हे क्रमांक, संपादनाचे क्षेत्र, जमिनीचे नकाशे, इत्यादी कागदपत्रे उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक ७ (मोहोळ), सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर-४१३ ००१ यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळांत पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**अनुसूची**

**सोलापूर महानगरपालिका**

**जिल्हा सोलापूर, गाव मजरेवाडी**

| अ. क्र. | संपादन करावयाच्या जागेचे | | संपादनाचे प्रयोजन |
|---|---|---|---|
| | सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्र चौ. मी. | |
| १ | जुना सर्व्हे क्रमांक ३०५-अ, नवीन सर्व्हे क्रमांक १३२/३-अ पैकी | ८९६.०० | सुधारित मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव सार्वजनिक वापर या प्रस्तावाकरिता आरक्षित असलेल्या क्षेत्रापैकी "पाण्याची टाकी" या वापरांतर्गत क्षेत्राचे भूसंपादन. |

**रामचंद्र शिंदे,**
जिल्हाधिकारी, सोलापूर.

सोलापूर, २६ एप्रिल २०१८.

---

***अधिसूचना***

क्रमांक २०१८/मशा/कार्या.-३/दरखास्त-गावठाण/आरआर-२५५/दुरुस्ती--या कार्यालयाकडील पत्र क्रमांक मशा/कार्या-३/३-अ/आरआर-१८६८/०८, दिनांक ३१ ऑक्टोबर २००८ अन्वये मौजे अक्कलकोट तालुक्यातील कसबे अक्कलकोटमधील समर्थनगर या वाड्याचे स्वतंत्र महसुली गावामध्ये रूपांतर करणेची अंतिम अधिसूचना अनुसूचीसह (भूमापन क्रमांक) महाराष्ट्र शासन राजपत्र, ११ डिसेंबर २००८, अग्रहायण २०, शके १९३० रोजी प्रसिद्ध करणेत आली आहे. सदर प्रसिद्ध करणेत आलेल्या अधिसूचनेमधील अनुसूचीमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत येत आहे.

**या ऐवजी**

---

महाराष्ट्र शासन राजपत्र, ११ डिसेंबर २००८, अग्रहायण २०, शके १९३०, कसबे अक्कलकोटच्या अनुसूचीमध्ये गट नंबर ८७७-अ व ८७७-ब तसेच गट नंबर १७९/अ व गट नंबर १७९/ब असे प्रसिद्ध झालेले आहे.

**Schedule-B—*contd.***

| Sr. No. 1 | Gat Nos. 2 | Area 3 (C.C.A.) Ha. |
|---|---|---|
| 268 | 888/1 | 0.39 |
| 269 | 888/2 | 0.30 |
| 270 | 888/3 | 0.30 |
| 271 | 888/4 | 0.20 |
| 272 | 889/1/A | 1.98 |
| 273 | 889/1/B | 2.10 |
| 274 | 889/1/C | 1.98 |
| 275 | 889/2/A/1/A | 0.20 |
| 276 | 889/2/A/1/B | 2.00 |
| 277 | 889/2/A/1/BH | 0.63 |
| 278 | 889/2/A/2/A | 1.61 |
| 279 | 889/2/A/2/B | 0.81 |
| 280 | 889/2/A/2/C | 1.61 |
| 281 | 889/2/A/3 | 0.05 |
| 282 | 889/2/B | 2.00 |
| 283 | 890 | 0.09 |
| **Total ..** | **283** | **338.35** |

**VAIJNATH MANMATHAPPA CHILLE,**
Executive Engineer,
Minor Irrigation Division No. 1,
taluka Sangola, district Solapur.

Solapur, 27th April 2018.

---

**महापालिका आयुक्त यांजकडून**

**कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर**

**वाचा.--** (१) सन २०१५ चा महाराष्ट्र लोकसेवा हक्क, अध्यादेश क्रमांक ५

(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र. क्र. ३९८/नवि-२०, दिनांक ४ सप्टेंबर २०१७

क्रमांक साप्र/रवका विभाग/वशि-१/१६०/२०१८.— राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ दिनांक २ ऑगस्ट २०१५ च्या अधिसूचनेन्वये जारी करण्यात आलेला आहे. या अंतर्गत उपरोक्त संदर्भ क्रमांक २ चे शासन निर्णयामध्ये नमूद केंद्र शासनाच्या Ease of Doing Business च्या अनुषंगाने महत्त्वाच्या असलेल्या मालमत्ता कर, पाणीपट्टी, ना-हरकत प्रमाणपत्र व व्यवसाय परवाना या ४ घटकांतर्गत येणाऱ्या मालमत्ता करासंदर्भात एकूण १२ सेवा, पाणीपुरवठा वसुली संदर्भात १४ सेवा व ना-हरकत प्रमाणपत्र संदर्भात २ सेवासंबंधी आवश्यक कागदपत्रे, फी, नियतकालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी या आदेशाखाली अधिसूचित करणे आवश्यक आहे.

त्यानुसार कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील पात्र नागरिकांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे लोकसेवा अधिसूचित करण्यात येत आहेत. तसेच त्याची अंमलबजावणी करणारे पदनिर्देशित अधिकारी, तसेच या सेवा वेळेवर न पुरविल्यास त्यावर नियंत्रण ठेवणेच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि विहित कालमर्यादा अधिसूचित करून जाहीर प्रकटन करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५**

**कलम ३ अन्वये कोल्हापूर महानगरपालिकेने जाहीर करावयाच्या लोकसेवेचा तपशील**

| अ. क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | नव्याने कर आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. भोगवटा प्रमाणपत्र | महानगरपालिका स्तरावर निश्चित केलेला दर. | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |
| २ | पुन:कर आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज | महानगरपालिका स्तरावर निश्चित केलेला दर. | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |

## परिशिष्ट--चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | कराची मागणी पत्र तयार करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज | विनामूल्य | ३ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |
| ४ | करमाफी मिळणेबाबत | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला. | विनामूल्य | ७ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला. | १. विहित नमुन्यातील अर्ज | विनामूल्य | ३ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |
| ६ | मालमत्ता कर उतारा देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला. | प्रती प्रत रु. ६० | ३ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |
| ७ | रहिवास नसलेल्या मालतत्तांना करात सूट मिळणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला. | विनामूल्य | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |
| ८ | मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे/ इतर मार्गाने. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला.<br>३. मालकी हक्काची कागद-पत्रे नोंदणीकृत खरेदी खत. | १. हस्तांतरण फी रु. ७००<br>२. थर्ड पार्टी हस्तांतर रु. ७५० | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |
| ९ | स्वयंमूल्यांकन | १. विहित नमुन्यातील अर्ज | विनामूल्य | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |
| १० | आक्षेप नोंदवणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला. | विनामूल्य | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |
| ११ | उपविभागामध्ये मालमत्ता विभाजन / तुटक. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला.<br>३. मालकी हक्काची कागद-पत्रे (खरेदीखत, वाटणीपत्र. बक्षिसपत्र इत्यादी). | रु. ७५० | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |
| १२ | मालमत्ता पाडणे व पुर्नबांधणी. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला. | विनामूल्य | १५ दिवस | कर अधीक्षक | कर निर्धारक व संग्राहक. | उपायुक्त क्र. २ |
| १३ | नवीन नळजोडणी | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. मालकी हक्काची कागदपत्रे<br>३. थकबाकी नसलेचा दाखला. | फॉर्म फी रु. २००<br>१. १/२ इंची नळ कनेक्शन घरगुती रु. २,५००. व्यापारी रु. ३,७००.<br>२. ३/४ इंची नळ कनेक्शन घरगुती रु. ४,६००. व्यापारी रु. ४,८०० औद्योगिक रु. ६,८००.<br>३. १ इंची नळ कनेक्शन घरगुती रु. ९४००. व्यापारी रु. ११,४००. औद्योगिक रु. १८,४००.<br>४. १ १/२ इंची नळ कनेक्शन घरगुती रु. १५,६००. व्यापारी रु. १८,६००. औद्योगिक रु. २५,६००. | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता. | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |

## परिशिष्ट--चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ५. २ इंची नळ कनेक्शन घरगुती रु. २५,८००. व्यापारी रु. २६,८००. औद्योगिक रु. ४०,३००. | | | | |
| १४ | मालकी हक्कात बदल | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. मालकी हक्काची कागदपत्रे<br>३. थकबाकी नसलेचा दाखला | १/२ इंची नळ कनेक्शनसाठी खरेदी पत्राने रु. १,१००<br>वारसा हक्काने रु. २००.<br>कनेक्शनच्या साईज-प्रमाणे सुपरव्हिजन फीमध्ये वाढ होईल. | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| १५ | जळजोडणी आकारामध्ये बदल करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला | १/२ इंची व्यासासाठी शुल्क रु. १००.<br>३/४ इंची व्यासासाठी शुल्क रु. २००.<br>१ इंची व्यासासाठी रु. ४००. | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| १६ | तात्पुरते/कायमस्वरूपी नळजोडणी खंडित करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला | फॉर्म फी १०<br>१५ मी. मी. व्यासाकरिता शुल्क रु. २००.<br>२० मी. मी. व्यासाकरिता शुल्क रु. ३०० तेथून पुढे प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे. | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| १७ | पुर्न:जोडणी | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला | फॉर्म फी १०<br>१५ मी. मी. व्यासाकरिता शुल्क रु. ४००.<br>२० मी. मी. व्यासाकरिता शुल्क रु. ६५० तेथून पुढे प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे. | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| १८ | वापरामध्ये बदल करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला | नि:शुल्क | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| १९ | पाणी देयक तयार करणे. | विहित नमुन्यातील अर्ज | रु. ५ | ३ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| २० | प्लंबर परवाना | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसलेचा दाखला | नळकारागीर अनामत रक्कम रु. ५००.<br>परवाना फी रु. २००.<br>ड्रेनेज कारागीर- अनामत रक्कम रु. ५००.<br>परवाना फी २००. | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |

## परिशिष्ट--चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | प्लंबर परवाना नूतनीकरण. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र.<br>३. थकबाकी नसलेचा दाखला | नळकारागीर नूतनीकरण फी रु. ६५०. मासिक दंड-१००. ड्रेनेज कारागीर नूतनीकरण फी रु. ६५०. मासिक दंड-१००. | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| २२ | थकबाकी नसलेचा दाखला. | विहित नमुन्यातील अर्ज | फार्म फी रु. ५० तसेच ग्राहकांसाठी शुल्क रु. ७५ व बिगर ग्राहकांसाठी शुल्क रु. १५०. | ३ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| २३ | नादुरुस्त मीटर तक्रार करणे. | विहित नमुन्यातील अर्ज | फॉर्म फी रु. १० १५ मी. मी. व्यासाकरिता शुल्क रु. २००. २० मी. मी. व्यासाकरिता शुल्क रु. ३०० तेथूनपुढे प्रत्यक्ष खर्चाप्रमाणे. | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| २४ | अनधिकृत नळजोडणी तक्रार. | विहित नमुन्यातील अर्ज | मा. महासभा ठराव क्र. ८, दि. २७-५-२०१३ चे धोरणानुसार दंडात्मक कारवाई करणे. | -- | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| २५ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार. | विहित नमुन्यातील अर्ज | नि:शुल्क | ३ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| २६ | पाण्याची गुणवत्ता तक्रार. | विहित नमुन्यातील अर्ज | नि:शुल्क | ३ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता. |
| २७ | व्यापार/व्यवसाय/ साठा करणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र. | योग्यप्रकारे भरलेले अर्ज प्रॉपर्टी कार्ड, गुमास्ता, जागेचा नकाशा, भोगवटा प्रमाणपत्र, जागा मालकाचे संमतीपत्र व घरफाळा पावती. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९-११-२०१६. | ७ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक. | अति. आयुक्त |
| २८ | मंडपासाठी ना-हरकत प्रमाणपत्र. | १. मंडप उभारणीसाठी परवानगी मागणी अर्ज.<br>२. इस्टेट विभाग अभिप्राय<br>३. शहरवाहतूक नियंत्रण शाखेचा अभिप्राय.<br>४. संबंधित पोलीस ठाणेचा अभिप्राय. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. १६४, दि. २०-०२-२०१० नुसार खड्डे फी व मा. महासभा ठराव क्र. ५३, दि. २८-२-२०१७ प्रमाण मंडप उभारणेचा दर निश्चित केलेला आहे. तसेच कार्यक्रमाचे स्वरूपानुसार अनामत रक्कम आकारणेत येते. | ७ दिवस | उपशहर अभियंता | प्रभागक्षेत्र अधिकारी. | अति. आयुक्त |

## परिशिष्ट--चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | नवीन परवाना मिळणे | योग्यप्रकारे भरलेले अर्ज प्रॉपर्टी कार्ड, गुमास्ता, जागेचा नकाशा, भोगवटा प्रमाणपत्र, जागा मालकाचे संमतीपत्र व घरफाळापावती. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९-११-२०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक. | अति. आयुक्त |
| ३० | परवान्याचे नूतनीकरण | नूतनीकरण अर्ज, परवाना प्रत. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. ५१, दि. २८-०२-२०१७. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक. | अति. आयुक्त |
| ३१ | परवाना हस्तांतरण | मागणी अर्ज, परवाना-धारकाचे संमतीपत्र अगर मृत्यू दाखला व इतर वारसांची संमतीपत्र. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९-११-२०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक. | अति. आयुक्त |
| ३२ | परवाना दुय्यम प्रत | मागणी अर्ज, जीर्ण प्रत, गुमास्तावरील नोंद. | नि:शुल्क | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक. | अति. आयुक्त |
| ३३ | व्यवसायाचे नाव बदलणे. | मागणी अर्ज, गुमास्तावरील नोंद. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९-११-२०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक. | अति. आयुक्त |
| ३४ | व्यवसाय बदलणे | मागणी अर्ज, गुमास्तावरील नोंद. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९-११-२०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक. | अति. आयुक्त |
| ३५ | परवाना/भागीदाराचे नाव बदलणे. | मागणी अर्ज, भागीदारी पत्र, व्यवसायधारकाचे संमतीपत्र, गुमास्ता. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९-११-२०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक. | अति. आयुक्त |
| ३६ | भागीदारांच्या संख्येत बदल (वाढ/कमी). | मागणी अर्ज, भागीदारी पत्र, व्यवसायधारकाचे संमतीपत्र, गुमास्ता. | महापालिका स्तरावर निश्चित केले मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९-११-२०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक. | अति. आयुक्त |
| ३७ | परवाना रद्द करणे | मागणी अर्ज, वीज कनेक्शन रद्द दाखला, गुमास्ता रद्द दाखला, जागेवरील पंचनामा. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. २९१, दि. १९-११-२०१६. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक. | अति. आयुक्त |
| ३८ | कालबाह्य परवाना-साठी नूतनीकरण सूचना. | थकबाकी नोटिस, परवाना नूतनीकरण करून सिस्टीम-वर घेणे. | महापालिका स्तरावर निश्चित केले, मा. महासभा ठराव क्र. ५१, दि. २८-०२-२०१७, १० टक्के लेट फीसह प्रतिवर्षी निश्चित केले जातात. | १५ दिवस | परवाना निरीक्षक | परवाना अधीक्षक. | अति. आयुक्त |

टीप : मा. महासभेतील निर्णयानुसार वेळोवेळी दरातील बदल लागू राहील.

कोल्हापूर, २४ एप्रिल २०१८.

**डॉ. अभिजित चौधरी,**
आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका.